६९

क्र.का.५/मुद्रांक-११/ १२६९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
नविन प्रशासकीय इमारत ,
तळ मजला, पुणे-१.
दिनांक :- १५/०९/२०११

**विषय :- कमी दर्शनी किंमतीचे मुद्रांक उपलब्ध होत नसल्याबाबत...**

## परिपत्रक

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, बहुसंख्य मुद्रांक विक्रेत्यांकडून मुद्रांक विक्री परवान्यामध्ये नमूद केलेल्या सर्व प्रकारचे मुद्रांकाचे उचल केली जात नाहीत. त्यामुळे जनतेस आवश्यकता असतांनाही कोर्ट फी लेबल्स् व कमी दर्शनी किंमतीचे मुद्रांक उपलब्ध होत नाहीत. तसेच कृत्रिम टंचाई असल्याचे भासून, जादा दराने जनतेस मुद्रांकाची विक्री करुन, रु.१०० च्या पट्टीत मुद्रांक घेण्याबाबत सक्ती करतात. त्यामुळे जनतेची गैरसोय होवून, मुद्रांक विक्रेत्याच्या विरुध्द तक्रारी या कार्यालयास प्राप्त होतात.

तरी अशा तक्रारी प्राप्त होवू नये व जनतेस सुलभरित्या मुद्रांक उपलब्ध व्हावेत यासाठी या परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात की,

१) प्रत्येक दुय्यम निबंधक यांनी दरमहा मुद्रांक विक्रेत्यांच्या रजिस्टर / अभिलेखाची तपासणी करताना कमी मूल्याच्या मुद्रांकाची उचल केली आहे किंवा नाही, हे पहावे.

२) मुद्रांक विक्रेते नेमून दिलेल्या ठिकाणीच व्यवसाय करतात का?

३) जनतेस सर्व प्रकारच्या मुद्रांकाची विक्री करण्यात येते काय ?

४) मुद्रांकाची विक्री करीत असलेल्या ठिकाणी अचानक भेट देवून, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष चौकशी करुन, गैरवाजवी दराने विक्री होत नसल्याची खात्री करावी.

तरी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन, जनतेस सुलभ व सुरळीत रितीने मुद्रांक उपलब्ध होतील, याची प्राथम्याने दक्षता घेण्यात यावी. ज्या मुद्रांक विक्रेत्यांकडून अशा मुद्रांकाची कृत्रिम टंचाई करीत असल्याची बाब आपले निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुध्द त्वरीत कारवाई करण्यात यावी. याकरिता आपले अखत्यारीतील सर्व सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व मुद्रांक विक्रेत्यांना, या परिपत्रकातील सूचनांची त्वरीत काटेकोरपणे पालन करणेबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

का.प्र.मा.नोंमनि यांचे सहीची असे.

सह नोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक, म.रा. पुणे.

प्रत-

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
३) सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
२/- आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व दुय्यम निबंधकांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणून दयावे व त्यामधील सुचनांचे काटेकोर पालन होईल याची खात्री करावी.
४) सर्व कोषागार अधिकारी.